# विभागीय आयुक्त यांचे कार्यालय, अमरावती
## बायपास रोड,कॅम्प, अमरावती

ई-मेल : dycomdev@gmail.com वेबसाईट http://amravatidivision.gov.in

जा.क्र/अपरआ./विकास/पा.टं(ग्रामीण)/527/2026 दिनांक:-12/05/2026

**वाचा**:-1.पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्र.टंचाई-1099/प्र.क्र.12/ पापु-14 दि.03 फेब्रुवारी 1999

2. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्र.टंचाई-2016/प्र.क्र.143/पापु-14 दि.04 मे 2016

3.जिल्हाधिकारी वाशिम यांचे पत्र क्र/कक्ष-16/टंचाई/काबि-174/2026 दि.30.04.2026

(या कार्यालयास प्राप्त दि.05.05.2026)

आदेश:-

ज्याअर्थी जिल्हाधिकारी वाशिम यांनी पाणी टंचाई कृती आराखडा सन 2025-26 मध्ये समाविष्ठ असलेल्या खालील गावातील पाणी टंचाई निवारणार्थ विहीर खोलीकरण करणे/गाळ काढणे अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी विनंती केली आहे. **सदर अंदाजपत्रकास उप कार्यकारी अभियंता,ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद, वाशिम यांनी तांत्रिक मान्यता दिली असुन त्याबाबीस मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद वाशिम यांनी अनुमती दिलेली आहे.** तसेच पाणी टंचाई संदर्भाने सदर उपाययोजना घेण्यासाठी संबंधित तहसिलदार वाशिम गट विकास अधिकारी पंचायत समिती,वाशिम व सहाय्यक भूवैज्ञानिक भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा वाशिम यांनी शिफारस केल्याबाबत त्यांचे स्वाक्षरीचे **प्रपत्र ब** दिले असून सदर कामे जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीतुन घेणे शक्य नाही, असे प्रमाणपत्र **प्रपत्र क** मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद वाशिम यांनी दिले आहे.

त्याअर्थी वरील संदर्भाकित शासन निर्णय दि.03 फेब्रुवारी 1999 व दि. 04 मे 2016 अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन खालील गावांसाठी सन 2025-26 मधील पाणी टंचाई निवारणार्थ घ्यावयाच्या उपाययोजनांच्या अंदाजपत्रकास जिल्हाधिकारी वाशिम, मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प वाशिम व कार्यकारी अभियंता,ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जि.प वाशिम तसेच संबंधित गट विकास अधिकारी पंचायत समिती,वाशिम व सहाय्यक भूवैज्ञानिक भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा वाशिम यांनी सादर केलेल्या अभिप्रायास अनुसरुन तसेच खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**उपाययोजनेचे नाव:- विहीर खोल करणे/गाळ काढणे**

| अ.क्र | तालुका | गावाचे नाव | उपाययोजनांची संख्या | अंदाजपत्रकीय किंमत रुपये |
|---|---|---|---|---|
| 1 | वाशिम | अडोळी | 01 | 2,96,170 |
| 2 | | बोरी बु. | 01 | 2,98,185 |
| 3 | | दगड उमरा | 01 | 2,97,850 |
| 4 | | धानोरा खु. | 01 | 2,98150 |
| 5 | | एकांबा | 01 | 2,97,110 |
| 6 | | कळांबा महाली | 01 | 2,98,900 |
| 7 | | कोडाळा महाली | 01 | 2,97,625 |
| 8 | | खरोळा | 01 | 2,96,060 |
| 9 | | सावरगाव बर्डे | 01 | 2,98,900 |
| 10 | | उकळीपेन | 01 | 2,79,880 |
| | एकूण | | 10 | 29,58,830 |

(एकूण अक्षरी रु. एकोणतीस लक्ष अठ्ठावन्न हजार आठशे तीस फक्त)

अटी व शर्ती :-

1. योजनेची कामे ही सन 2025-26 (उन्हाळा सन 2026) च्या पाणी टंचाई काळातील असल्याने सदर काम दि.30 जुन 2026 पर्यंत किंवा त्यापूर्वी पूर्ण करुन याव्दारे प्रत्यक्ष पाणीपुरवठा सुरु करण्यात यावा.
2. योजनेची कामे पूर्ण होताच पाणी टंचाई संबंधी शासनाचे सर्व आदेशांचे पालन करावे
3. मागील टंचाई काळात केलेली कामे उपयुक्त नसतील तर पुनश्च: त्याच प्रकारची कामे घेण्यात येवु नये
4. प्रस्तावीत उपाययोजनातील काम सुरु करण्यापूर्वी व काम पूर्ण झाल्यावर यथास्थितीचा वस्तुनिष्ठ पंचनामा करुन घ्यावा.
5. प्रस्तावित उद्‌भवाला पुरेसे पाणी उपलबध आहे याची खात्री केल्यावरच योजनेचे पुढील कामे हाती घेण्यात यावीत.
6. योजनेच्या उद्‌भवाच्या शाश्वततेसाठी भूजल अधिनियम 2009 कलम 21.25 व 26 च्या तरतुदीचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.
7. योजनेच्या प्रस्तावित उद्‌भवापासून/विहीरीपासून 500.00 मी परिसरातील खाजगी विहीर कुपनलिकाचा उपसा बंद करण्याची जबाबदारी गट विकास अधिकारी,ग्रामसेवक व ग्रामपंचायत सदस्य यांची राहील.
8. योजनेच्या कामावरील एकूण खर्च कोणत्याही परिस्थितीत योजनेच्या मंजूर किंमतीपेक्षा वाढणार नाही याची खबरदारी घेण्यात यावी.
9. काम पूर्ण झाल्यावर योजनेचे काम प्रस्तावानुसार पूर्ण झाल्याचे कार्यकारी अभियंता,ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जि.प. वाशिम यांनी स्वत: कामाची पाहणी व तपासणी करुन प्रमाणपत्र द्यावे.

(नयना गुंडे,भा.प्र.से)
विभागीय आयुक्त
अमरावती

**प्रत माहितीकरिता तथा उचित कार्यवाहीकरिता:-**

**1.मा. प्रधान सचिव,पा.पु व स्वच्छता विभाग (पापु-14) मंत्रालय मुंबई .**
**2.जिल्हाधिकारी,वाशिम**
**3.मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प वाशिम**

विभागीय आयुक्त
अमरावती